# सोळा हजार टन एलपीजीसह 'ग्रीन आशा' जेएनपीए बंदरात

## घरगुती गॅसपुरवठा सुरळीत होण्याची शक्यता

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**उरण :** इराणची होर्मूज सामुद्रधुनी पार करीत 'ग्रीन आशा' हे १६ हजार टन एलपीजी भरलेले जहाज बुधवारी उशिरा जेएनपीएच्या द्रव्य जेट्टीवर पोहोचले. त्यामुळे गॅसटंचाईच्या झळा सोसणाऱ्या भारताला दिलासा मिळाला आहे. या जहाजाचे जेएनपीएकडून उत्साहात स्वागत करण्यात आले. हे जहाज सुरक्षितपणे आल्याने आनंद व्यक्त केला जात आहे. या जहाजावरील सर्वजण सुखरूप असल्याची माहिती जेएनपीएकडून देण्यात आली. जेएनपीएमध्ये भारत पेट्रोलियम आणि इंडियन ऑइल या तेल कंपन्याच्या जेट्टी आहेत. त्याठिकाणी हे जहाज उभे करण्यात आले आहे.

२८ फेब्रुवारीपासून पश्चिम आशियात इराण इस्रायल आणि अमेरिका यांच्यातील युद्धामुळे तेल व तेलजन्य पदार्थ आयातीवर अवलंबून असलेल्या भारतीय नागरिकांना घरगुती गॅसच्या तुटवड्याचा सामना करावा लागत आहे. पश्चिम आशियातील अनेक देशांतून विशेषतः इराणमधून लाखो टन गॅस आणि तेलजन्य पदार्थांची आयात केली जात आहे. गॅस आणि तेलजन्य पदार्थ असलेली जहाजे जेएनपीए बंदरात नांगरली जातात. त्यानंतर या जहाजातील गॅस आणि तेल वाहिन्यांद्वारे साठवणूक टाक्यांत साठवून त्याचे देशभरात वितरण केले जात आहे. यासाठी बंदराच्या परिसरात विविध कंपन्यांच्या मोठ्या प्रमाणात गॅस व तेलजन्य पदार्थ साठवणूक टाक्या उभारण्यात आल्या आहेत.

जेएनपीए बंदरात लाखो टन तेल, गॅस व तेलजन्य पदार्थांची जहाजे येत होती. मात्र युद्धामुळे त्यांची वाहतूक बंद झाली. बुधवारी इराण आणि अमेरिका यांनी युद्धविराम घोषित केल्यानंतर इराणच्या मार्गातून येणाऱ्या तेलवाहू जहाजांचा मार्ग पुन्हा खुला झाला आहे. त्यानंतर भारतात आलेल्या 'ग्रीन आशा'मुळे गॅसपुरवठ्याच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

# 'रेरां'तर्गत निकाली निघालेला परताव्याचा निर्णयच अंतिम

## उच्च न्यायालयाने कंपनीचा दावा फेटाळला

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** कोणताही पक्षकार नंतरच्या न्यायालयीन घडामोडींचा आधार घेऊन रेरांतर्गत आधीच निकाली

निघालेले परताव्याचे प्रकरण पुन्हा सुरू करण्याची मागणी करू शकत नाही, असा महत्त्वाचा निर्वाळा उच्च न्यायालयाने दिला आहे.

पुणे येथील एका प्रकल्पाच्या संदर्भात, २०१९ मधील परताव्याचा आदेश आणि २०२१ मधील वसुलीचा आदेश रद्द करण्याच्या मागणीसाठी 'मार्वल लँडमार्कस प्रा. लि.' ने दाखल केलेली याचिका फेटाळून लावताना न्यायमूर्ती सोमशेखर सुंदरेसन यांच्या एकलपीठाने हा निर्वाळा दिला. कायदा आळशी लोकांचे रक्षण करत नाही, असेही एकलपीठाने म्हटले.

'न्यूटेक प्रमोटर्स अॅण्ड डेव्हलपर्स प्रा. लि. विरुद्ध उत्तर प्रदेश सरकार' या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने २०२१ मध्ये दिलेल्या निकालामुळे पूर्वीचा आदेश अवैध ठरतो. 'रेरा'अंतर्गत काम करणारे न्यायनिर्णायक अधिकारी केवळ नुकसानभरपाईबाबत निर्णय देऊ शकतात, परतावा मंजूर करू शकत नाहीत, असा दावा कंपनीने केला. मात्र एकलपीठाने कंपनीचा हा दावा फेटाळून लावला आणि सर्वोच्च न्यायालयातील हे प्रकरण न्यायनिर्णायक अधिकाऱ्याकडे अधिकारांचे प्रत्यक्ष हस्तांतरण करण्याशी संबंधित नव्हते. तसेच, न्यायालयाचे निकाल संदर्भाला बगल देऊन वाचले जाऊ शकत नाहीत, असेही एकलपीठाने स्पष्ट केले.

> 'रेरा' कायद्यांतर्गत कायदेविषयक अधिकार वगळता, इतर कार्ये न्यायनिर्णायक अधिकाऱ्यांचाही सोपवता येतात. न्यायनिर्णायक अधिकारी प्रामुख्याने नुकसानभरपाईच्या दाव्यांचीच हाताळणी करत असले, तरी त्यांना परताव्याशी संबंधित बाबींवर निर्णय घेण्याचे कामही सोपवले जाऊ शकते. - उच्च न्यायालय

'रेरा'च्या न्यायनिर्णायक अधिकाऱ्याने एक आदेश पारित करताना घरखरेदीदार सिद्धार्थ मोहन पालेशा यांना १.३५ कोटी रुपये १०.२ टक्के वार्षिक व्याजाने परत करण्याचे आदेश कंपनीला दिले होते. तथापि, कंपनीने कायद्याने निश्चित केलेल्या ६० दिवसांच्या अपील कालावधीत या आदेशाला आव्हान दिले नाही. त्यामुळे वसुलीची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती.

### लिंकन हाऊसच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा

**मुंबई :** दक्षिण मुंबईतील भुलाभाई देसाई रोडवरील ऐतिहासिक लिंकन हाऊसच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. या पुनर्विकासाला विरोध करणाऱ्या जनहित याचिकेच्या हेतूवर प्रश्न उपस्थित करून उच्च न्यायालयाने ती फेटाळली.

या पुनर्विकासाला विरोध हा वैयक्तिक आणि खासगी हेतूने करण्यात आल्याचे निरीक्षण मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने याचिका फेटाळताना नोंदवले. तसेच २०१८ मध्ये पुनर्विकासाला दिलेली स्थगितीही न्यायालयाने यावेळी उठवली. पालिका प्रशासनाने विकासक मेसर्स कृष्णा अँड कंपनीला दिलेल्या परवानग्या, सवलती या मनमानी, बेकायदा आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या असल्याचा आरोप अल्टामाउंट रोड एरिया सिटिझन्स समितीने जनहित याचिकेद्वारे केली होती. न्यायालयाने परवानग्यांमध्ये कोणतीही अनियमितता नसल्याचे निरीक्षण नोंदवले.

# पहिला टूथब्रश आजही पृथ्वीवर पडून!

## राज्यपालांच्या उपस्थितीत अजब दावा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** 'ईश्वर सर्वव्यापी आहे, तसेच प्लास्टिकही आज सर्वव्यापी झाले असून हिमालयाच्या शिखरापासून समुद्राच्या सखोल भागापर्यंत प्लास्टिक पोहोचले आहे. तुम्ही वापरलेला पहिला टूथब्रश आजदेखील जमिनीच्या पोटात कोठेतरी पडून असल्याचा अजब दावा संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रमाचे भारतातील प्रमुख बाळकृष्ण पशुपती यांनी गुरुवारी येथे केला.

संयुक्त राष्ट्र संघाच्या पर्यावरण विभागातर्फे 'प्लास्टिक उत्पादने व प्लास्टिक पॅकेजिंग आवरणांचा पर्यावरणावरील दुष्परिणाम' या विषयावर आयोजित तज्ज्ञांच्या चर्चासत्रात पशुपती बोलत होते. राज्यपाल जिष्णु देव वर्मा, रिझर्व बँकेचे कार्यकारी संचालक आर. केशवन यांच्यासह विविध कॉर्पोरेट कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच या क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना राज्यपालांनी देशात दरवर्षी ३४ लाख टन प्लास्टिक कचरा तयार होत असून यातील ४० टक्के प्लास्टिक अंतिमतः नदी, नाले व भूगर्भात जाऊन पर्यावरणाचे मोठे नुकसान होत असल्याचे सांगितले. प्लास्टिक प्रदूषणामुळे मत्स्यव्यवसाय, पर्यटन व आरोग्याला धोका निर्माण होत आहे. त्यामुळे प्लास्टिकला योग्य पर्याय शोधावा लागेल आणि प्लास्टिक प्रदूषण कमी करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाला योगदान द्यावे लागेल असे आवाहनही त्यांनी केले.

स्वच्छ पाणी व स्वच्छ पर्यावरणाशिवाय विकसित भारताचे लक्ष्य गाठता येणार नाही असे सांगून प्लास्टिक पासून पर्यावरणाला होणारा धोका लक्षात घेऊन कॉर्पोरेट, उद्योग, नीती निर्माते या सर्वांना या कार्यात पुढाकार घ्यावा लागेल व त्यासाठी विद्यार्थी, युवक व समाजाच्या इतर सर्व घटकांमध्ये जागरुकता निर्माण करावी लागेल, असे राज्यपालांनी सांगितले. शाश्वततेशिवाय झालेल्या विकासाला 'विकास' म्हणता येणार नाही, असेही ते म्हणाले.

### पर्यावरण रक्षणासाठी रिझर्व्ह बँकेचा पुढाकार

बाळकृष्ण पशुपती यांनी यावेळी प्लास्टिक वस्तू व प्लास्टिक आवरणामुळे होणारे प्रदूषण कमी करणे ही काळाची गरज असल्याचेही सांगितले. रिझर्व्ह बँकेमार्फत पर्यावरण रक्षणाच्या कार्याला वित्त पुरवठ्याच्या माध्यमातून चालना दिली जात असल्याचे बँकेचे कार्यकारी अध्यक्ष आर. केशवन यांनी यावेळी सांगितले. यावेळी राज्यपालांच्या हस्ते 'वर्क इन प्रोग्रेसः रिड्युसिंग द प्लास्टिक फूटप्रटिं ऑफ प्रॉडक्ट्स अँड पॅकेजिंग' या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

# मुंबईच्या कमाल तापमानात वाढ होण्याचा अंदाज

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबईत मागील काही दिवसांपासून कमाल तापमानात घट नोंदली जात असून त्यामुळे तीव्र उकाड्यापासून मुंबईकरांना काहीसा दिलासा मिळाला होता. मात्र, गुरुवारी कमाल तापमानात १ ते २ अंशांनी वाढ नोंदवण्यात आली असून शुक्रवार आणि शनिवारीदेखील कमाल तापमानातही वाढ होणार असून उन्हाची काहिली वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मुंबईतील कमाल तापमानात मागील काही दिवसांच्या तुलनेत गुरुवारी काहीशी वाढ नोंदली गेली. हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात गुरुवारी ३३.२ तर सांताक्रूझ केंद्रात ३३.५ अंश सेल्सिअसची नोंद झाली. पुढील चार दिवसांत राज्यातील कमाल तापमानात २ ते ३ अंशांनी वाढ होईल, अशी शक्यता आहे. किमान तापमानातही काहीशी वाढ झाली असून कुलाबा केंद्रात गुरुवारी २५.३ तर सांताक्रूझ केंद्रात २५.२ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली.

**रायगड, ठाण्याला यलो अलर्ट**

मुंबईसह रायगड, ठाणे आणि रत्नागिरी आदी भागांना शुक्रवारी हवामान विभागाकडून 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. शनिवारीही या भागांसह पालघर, सिंधुदुर्ग जिल्ह्यात उष्ण आणि दमट वातावरण राहणार आहे.

### सोलापूर, नांदेडसाठी विमान सेवा

**मुंबई :** राज्यांतील जिल्ह्यांना विमानाने जोडून प्रवाशांना अधिक वेगवान सेवा देण्यासाठी विमान कंपन्या प्रयत्नशील आहेत. या प्रयत्नांचा एक भाग म्हणून 'फ्लाय ९१' कंपनीने विमान सेवा विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे. यात आंध्र प्रदेशच्या राजामुंदरी, विजयवाडा, हुबळी या शहरांमधून विमानसेवा उपलब्ध करतानाच सोलापूर-हैदराबाद आणि गोवा-सोलापूर मार्गांवर अतिरिक्त सेवांचे नियोजन केले आहे.

गोव्यात मुख्यालय असलेल्या या या कंपनीची येत्या काळात नांदेडहूनही विमान फेरी सेवा सुरू होणार आहे. देशातील विविध लहान शहरांना जोडणाऱ्या या विमानसेवांचा विस्तार १० ते १७ एप्रिल दरम्यान टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात येणार आहे. यात हैदराबाद-राजमुंदरी आणि हैदराबाद-विजयवाडा या मार्गांवर दररोज दोन, तर हैदराबाद-हुबळी आणि हुबळी-बेंगळुरू दरम्यान दररोज एक फेरी सुरू होईल. तर हैदराबाद-सोलापूर या मार्गावर आठवड्याला पाच, गोवा-सोलापूर मार्गावर आठवड्याला सहा विमान फेऱ्या सुरू होतील.

# मुंबई-नांदेड रेल्वे कागदावरच!

**कुलदीप घायवट, लोकसत्ता**

**मुंबई :** एकीकडे मुंबईहून उत्तर प्रदेश, बिहारकडे जाणाऱ्या रेल्वे

गाड्यांना नियमित करण्याचा निर्णय रेल्वे मंडळाकडून घेण्यात येत आहे. परंतु, दुसरीकडे मुंबई ते नांदेडदरम्यान प्रस्तावित रेल्वेगाडी अद्याप सुरू न झाल्याने नाराजी व्यक्त होत आहे. एलटीटी ते नांदेड रेल्वेगाडीला रेल्वे मंडळाने ऑगस्ट २०२३ मध्ये मंजुरी दिली होती. मात्र, प्रत्यक्षात ती रेल्वेगाडी अद्यापही कागदावरच असल्याचे वास्तव समोर आले आहे.

एलटीटी - हुजूर साहेब नांदेड या गाडीची उद्घाटनाची फेरी चालवून नियमित सेवा सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. परंतु, रेल्वे मंडळाने मंजुरी दिल्यानंतर दोन वर्षे उलटून गेली तरी ही गाडी सुरू झाली नाही. मराठवाड्यातील नांदेड, परभणी, हिंगोली आदी जिल्ह्यांतील प्रवाशांसाठी ही गाडी महत्त्वाची मानली जाते. सध्या या भागातील प्रवाशांना थेट आणि नियमित रेल्वेसेवेचा अभाव जाणवत आहे. वंदे भारत एक्स्प्रेसचा प्रवास परवडणारा नसल्याने प्रवाशांना सध्या रस्ते मार्गाने मुंबई गाठावी लागत आहे. नांदेड हे धार्मिक, शैक्षणिक व व्यापारीदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र असून मुंबई - नांदेड दरम्यान थेट रेल्वेसेवेची मागणी होत आहे. सध्या उपलब्ध गाड्यांमध्ये मोठी गर्दी असल्याने प्रवाशांना तिकीट मिळवणे कठीण जात आहे.

> रेल्वे मंडळाने एलटीटी ते नांदेड दरम्यान रेल्वेगाडीला मंजुरी दिली होती. मात्र, काही तांत्रिक आणि वाहतुकीच्या कारणामुळे या रेल्वेगाडीच्या फेऱ्या सुरू झाल्या नाहीत. परंतु, त्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.
> - ए. श्रीधर, मुख्य जनसंपर्क अधिकारी, दक्षिण मध्य रेल्वे

### मुंबईवरून बिहारला जाणारी रेल्वे नियमित!

मध्य रेल्वेने प्रवाशांच्या सोयीसाठी एलटीटी ते धनबाद अशी नवीन साप्ताहिक सेवा सुरू केली आहे. ही गाडी दर बुधवारी धावणार असून ८ एप्रिल रोजी ही सेवा सुरू झाली. धनबाद ते एलटीटी रेल्वे गाडी दर सोमवारी धावणार असून तिची पहिली फेरी ६ एप्रिल रोजी झाली, अशी माहिती मध्य रेल्वे प्रशासनाद्वारे देण्यात आली.

# मुंबई, ठाण्यातील विजेची चिंता दूर

## बाभळेश्वर-कुडूस वीजवाहिनी कार्यान्वित

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पालघर :** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचा (महापारेषण)

महत्त्वाकांक्षी बाभळेश्वर - कुडूस ४०० के.व्ही. हा वीजवाहिनी प्रकल्प गुरूवारी पूर्ण होऊन कार्यान्वित करण्यात आला. यामुळे सुमारे पाच मेगावॅट वीज नुकसान कमी होणार असून मुंबई महानगर प्रदेशातील विद्युत दाबामध्ये सुधारणा होणार आहे. तसेच या द्विपथ वाहिनीवरून सुमारे ३००० मेगावॅटपर्यंत अतिरिक्त वीज वहन क्षमता उपलब्ध होणार असून मुंबई, ठाणे, पालघर आणि अहिल्यानगर जिल्ह्यांना मोठा फायदा होणार आहे.

हा प्रकल्प २०१३ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट होते. या प्रकल्पांतर्गत ७१५ मनोरे उभारण्यात आले असून त्यात नाशिक विभागातील ४८५, तर वाशीतील २३० मनोऱ्यांचा समावेश आहे.

### प्रकल्प १५ वर्षांनी पूर्णत्वास; १५०० कोटी खर्च

- या प्रकल्पासाठी सुमारे १५०० कोटी रुपये या प्रकल्पासाठी खर्च झाले असून विविध परवानग्या व स्थानिक अडचणींमुळे हा प्रकल्प पूर्ण होण्यास तब्बल १५ वर्षाचा कालावधी लागला.
- प्रकल्प राबविताना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. पुणे जिल्ह्यातील जागतिक दर्जाच्या रेडिओ दुर्बिणीच्या (जीएमआरटी) परिसरातून मार्ग जात असल्याने विशेष परवानग्या घ्याव्या लागल्या. तसेच जमिनीचा मोबदला, वनविभाग परवानग्या, राईट ऑफ वे (मार्गाधिकार) समस्या यांसारख्या आव्हानांवर मात करण्यात आली.
- काही भागात जंगलातून साहित्य वाहून नेण्यासाठी मानवी श्रमांचा वापर करावा लागला, तर काही ठिकाणी वीजवाहिन्यांवर हॉटलाइन स्ट्रिंगिंग करून काम पूर्ण करण्यात आले.
- या वीजवाहिनीमुळे सद्यःस्थितीतील पडघे-बाभळेश्वर १ व २ या वीजवाहिनीवरील ताण कमी होणार आहे. कुडूस उपकेंद्राला अतिरिक्त वीज उपलब्ध होऊन मुंबई परिसरातील वाढत्या वीज मागणीची पूर्तता सुलभ होईल.

**सांघिक कामाचे यश** मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्या नेतृत्वाखाली महापारेषणचे संचालक (प्रकल्प/संचलन) सतीश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता महेंद्र वाळके, वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता महेश भागवत यांनी व त्यांच्या चमूने ही यशस्वी कामगिरी केली आहे.

**महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम)**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
गृहनिर्माण भवन, म्हाडा
पोटमाळा, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), वांद्रे (पूर्व), मुंबई येथे **खरेदी विशेषतज्ञ (Procurement Specialist)** या १ पदासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. **पात्रता:** M.Com / MBA / Supply Chain / Procurement व संबंधित अनुभव आवश्यक. **अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख:** १७ एप्रिल २०२६, सायं. ६:०० वाजेपर्यंत **पत्ता:** महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग), कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१
**ईमेल:** adm.mavim@gmail.com
**अधिक माहितीसाठी भेट द्या:** https://mavimindia.org/en/careers

स्वाक्षरित/-
महाव्यवस्थापक, (वित्त व प्रशासन),
माविम, मुंबई

**जाहिरात क्र. ०१/२०२६**

**केंद्रिय विद्यालय संघटनेतील प्रतिनियुक्तीवर स्थानांतरणाद्वारे कार्यकारी अभियंता व सहाय्यक संचालकाचे (शासकिय भाषा) पद भरणे.**

केंद्रिय विद्यालय संघटन (केव्हीएस), शिक्षण मंत्रालयांतर्गत एक स्वायत्त संस्था, हे प्रतिनियुक्तीवर स्थानांतरणाद्वारे वेतन स्तर - १० मधील सहाय्यक संचालकाचे ०१ (एक) पद (शासकिय भाषा) आणि वेतन स्तर - ११ मधील कार्यकारी अभियंताचे ०१ (एक) पद भरण्याकरिता इच्छूक आहे. अधिक तपशीलाकरिता म्हणजेच पात्रता कसोट्या, अर्हता व शर्ती व अटींकरिता दिनांकित ०४ एप्रिल, २०२६ "एम्प्लॉयमेंट न्यूज"ची आवृत्ती व केंद्रिय विद्यालया संघटनेच्या www.kvsangathan.nic.in या वेबसाइटला भेट द्यावी.

अतिरिक्त आयुक्त (प्रशासन)

CBC 21106 /12/0001/2627

**BEFORE THE HON'BLE COURT OF ADDL, SMALL CAUSES COURT, MAYOHALL UNIT, AT BENGALURU**
**C.C. No. 59544/ 2018 (SCCH-21)**
**BETWEEN: M/s. BMM Ispat Limited**
#101, First Floor, Pride Elite, No.10, Museum Road, Bangalore-560 001. .....**COMPLAINANT**
**AND: 1. Shri Vaijanath Industries Private Limited,** Survey No.107, Shinoli (B.K) Taluka, Chandgad District, Kolhapur, Chandgad, Maharastra-416509. ......**ACCUSED NO.1**
**2. Mr. Girish Tukaram Huddar,** Director, Shri Vaijnath Industries Limited, Survey No. 107, Private Shirtoji (B.K) Taluka, Chandgad District, Kolhapur, Chandgad, Maharastra-416509 ...**ACCUSED NO.2**
**3. Dayanand Mallikarjun Shastri, Director,** Shri Vaijnath Industries Limited, Survey No.107, Private Shinoli (B.K) Taluka, Chandgad District, Kolhapur, Chandgad, Maharastra-416509 ......**ACCUSED NO.3**

**PROCLAMATION BY WAY OF PAPER PUBLICATION**

WHEREAS, a complaint has been made before me against Shri Vaijanath Industries Private Limited, Company registered under Companies Act, 2013, having its registered office at Survey No.107, Shinoli (B.K) Taluka, Chandgad District, Kolhapur, Chandgad, Maharastra 416509, represented by Mr. Girish Tukaram Huddar, Director, Shri Vaijnath Industries Private Limited, Survey No.107, Shinoli (B.K) Taluka, Chandgad District, Kolhapur, Chandgad, Maharastra 416509 and Mr. Dayanand Mallikarjun Shastri, Director, Shri Vaijnath Industries Private Limited, Survey No.107, Shinoli (B.K) Taluka, Chandgad District, Kolhapur, Chandgad, Maharastra-416509. And warrant of arrest thereupon issued has returned that the said accused cannot be found and whereas it has been shown to my satisfaction that there is no chance of securing the said accused. Hence, we are publishing this proclamation in the newspaper "LOKSATTA" and "FINANCIAL EXPRESS". Proclamation is hereby made that the Accused are required to appear before this Court to answer the said complaint on the **13th of May 2026.**

**By order of the court, Sheristedar,**
**Court Of Small Causes, Mayohall Unit, Bengaluru**

**भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था तिरुपती**
(शिक्षण मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत राष्ट्रीय हितार्थ एक स्वायत्त संस्था)

**"सहाय्यक प्राध्यापक श्रेणी-II" च्या पदांकरिता भरती**

"आयआयएसईआर तिरुपती" हे निव्वळ कंत्राटी तत्त्वावर सहाय्यक प्राध्यापक श्रेणी-II च्या पदांकरिता उत्तम शैक्षणिक रेकॉर्ड असलेल्या भारतीय नागरिकांकडून ऑनलाइन अर्ज मागवित आहेत. सविस्तर जाहिरातीकरिता, कृपया भेट द्या- **www.iisertirupati.ac.in>>Careers>>Faculty**
ऑनलाइन अर्जांच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख ३० एप्रिल, २०२६ आहे.
**जाहि. क्र. २७/२०२६/आयआयएसईआर-टी/रिक्रू./०९.०४.२०२६**

स्वाक्षरी/-
कुलसचिव

CBC21377/12/0002/2627

**Government of India**
**Ministry of Skill Development & Entrepreneurship**
**Directorate General of Training**
Skill India

**CITS ADMISSION NOTICE - SESSION 2026-27**

Admission to courses under **Craft Instructor Training Scheme (CITS)** at National Skill Training Institutes (NSTIs) and Institute for Training of Trainers (IToTs) for the academic **session 2026-27** will be made through **All India Common Entrance Test (AICET)**, scheduled to be held on **31.05.2026.** Applications are invited from eligible candidates for admission to CITS in various trades through the website **www.nimionlineadmission.in** from 18.04.2026 to 10.05.2026.

The AICET will be conducted as a Computer-Based Test (online) at various centres across the country.

**For more details visit:**
**www.nimionlineadmission.in**

Last date to submit the applications 10.05.2026

CBC 63101/11/0015/2526

**MAHAREL — NOTICE INVITING TENDER (NIT)**

**For Selection of Agency for Lease of 700 acres of land, obtaining Grid Connectivity and line ROW clearance for development of 175 MW Solar Project in Maharashtra (TO BE SUBMITTED DULY FILLED IN AND DIGITALLY SIGNED)**
Tender No. MREL/2026-27/175MW land/T01
**Date of issuance of invitation: 10.04.2026**
The Mahagenco Renewable Energy Ltd. (MahaGenco REL), Mumbai, India invites bids from eligible bidders for **Selection of Agency for Lease of 700 acres of land (7 land parcels of 100 acres each), obtaining Grid Connectivity and line ROW clearance for development of 175 MW (25 MW × 7) Solar Projects in Maharashtra.**
Bid document shall be available for download on website **https://www.bharat-electronictender.com** after acceptance of tender document fee (Rs. 50,000/- plus GST as applicable).

| | | |
|---|---|---|
| 1 | Start Date of Acceptance of Tender Fee by MREL and Download of Tender Document. | 10.04.2026, 12:00 Hrs. |
| 2 | Last Date of Acceptance of Queries / Comments from Bidders | 29.04.2026, 18:00 Hrs. |
| 3 | Pre-Bid Meeting | 30.04.2026, 11:30 Hrs. |
| 4 | Last Date of Acceptance of Tender Fee by MREL and Download of Tender Document | 08.05.2026, 18:00 Hrs. |
| 5 | Last Date for Submission of online Bid (Techno-Commercial and Price Bids) along with EMD | 11.05.2026, 14:00 Hrs. |
| 6 | Last Date for physical Submission of Techno-Commercial bid (Envelope–1) | 13.05.2026, 18:00 Hrs. |
| 7 | Opening of Techno–Commercial Bids | 15.05.2026, 11:00 Hrs. |
| 8 | Opening of Price Bid of Qualified Bidders | Will be intimated by mail |

MahaGenco REL reserves the right to cancel / withdraw this Invitation for Bids without assigning any reason for such decision. For more details of Notice for Invitation of Tender (NIT), please visit to Bharat portal **https://www.bharat-electronictender.com** as well as MAHAGENCO's official website **https://www.mahagenco.in** For further information, kindly Contact DGM (Commercial & Contracts) MahaGenco REL, E-mail ID **dgmcomcon@mrel.in** (Mobile no- +91 86522 00322). Further details / any amendment/ corrigendum / updates will be published only on **https://www.bharat-electronictender.com** only.

Sd/-
**Chief General Manager**
**MREL**

**Reliance**
Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी: ०२२-३५५५ ५००० • फॅक्स: ०२२-२२०४ २२६८ • ई-मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

**सूचना**

**छापील स्वरूपातील समभागांचे हस्तांतरण आणि डिमटिरिअलायझेशन (डिमॅट) साठी विशेष खिडकी**

कृपया याची नोंद घ्यावी की, सेबीचे परिपत्रक क्रमांक: एचओ/१३/११(२)२०२६-एमआयआरएसडी-पीओडी/आय/३७५०/२०२६ दिनांक ३० जानेवारी, २०२६ (**"सेबी परिपत्रक"**) नुसार, **छापील स्वरूपातील समभागांचे हस्तांतरण आणि डिमटिरिअलायझेशन (डिमॅट) यासाठी ४ फेब्रुवारी, २०२७ पर्यंत** एक विशेष खिडकीखुली राहील.

ही सुविधा अशा गुंतवणूकदारांसाठी उपलब्ध आहे ज्यांनी १ एप्रिल, २०१९ पूर्वी **रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड ("कंपनी") यांच्या छापील स्वरूपातील समभागांची खरेदी केली होती,** आणि:
(ए) ज्यांनी हस्तांतरणासाठी समभाग सादर केले नव्हते, किंवा
(बी) हस्तांतरणासाठी समभाग दार केले होते, परंतू दस्तऐवजातील त्रुटींमुळे ते नाकारण्यात आले, परत करण्यात आले, किंवा त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले होते.

**विशेष खिडकी यासाठी लागू आहे**
१ एप्रिल, २०१९ पूर्वी ज्यांची अंमलबजावणी करण्यात आली होती अशा हस्तांतरण करारासाठी ही खिडकी लागू आहे का याविषयी अधिक स्पष्ट माहितीसाठी, गुंतवणूकदारांनी खालील माहिती पहावी:

| १ एप्रिल, २०१९ पूर्वी हस्तांतरणासाठी दाखल केले होते का? | मूळ शेअर प्रमाणपत्र गुंतवणूकदाराकडे उपलब्ध आहे का? | विशेष खिडकीत दाखल करण्यासाठी पात्र आहेत का? |
|---|---|---|
| नाही - हे नव्याने दाखल करावेत | होय | होय (सेबीच्या परिपत्रकात नमूद केलेल्या अटींच्या अधीन) |
| होय, परंतु ते पूर्वी नाकारण्यात आले होते/ परत करण्यात आले होते | होय | |
| होय, दाखल करण्यात आले होते | नाही | नाही |
| नाही, दाखल करण्यात आले नव्हते | नाही | नाही |

**कृपया नोंद घ्यावी की, मूळ शेअर प्रमाणपत्रांसोबत हस्तांतरण करारपत्रे आणि इतर सहाय्यक कागदपत्रे असलेल्या विनंत्यांचाच विशेष खिडकी अंतर्गत विचार केला जाईल.**

ज्या गुंतवणूकदारांना विशेष खिडकीचा लाभ घ्यायचा आहे त्यांनी कंपनीचे **रजिस्ट्रार व समभाग हस्तांतरण एजंट, केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड** (युनिट: रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड), यांच्याशी संपर्क साधावा ज्यांचा पत्ता असा आहे: सेलेनियम टॉवर-बी, प्लॉट क्रमांक ३१ व ३२, गचीबॉवली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानाक्रमगुडा, हैदराबाद - ५०० ०३२.
अधिक माहितीसाठी गुंतवणूकदारांनी सेबीचे परिपत्रक पहावे, जे येथे उपलब्ध आहे: **https://tinyurl.com/29ab3727.**
काही चौकशी करायची असल्यास ती येथे पाठवावी: **rilinvestor@kfintech.com**

स्थळ : मुंबई
दिनांक : १० एप्रिल, २०२६

**रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड** करिता
स्वाक्षरी/-
**सावित्री पारेख**
कंपनी सेक्रेटरी आणि कंप्लायन्स ऑफिसर

www.ril.com